**महाराष्ट्र शासन**
विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती
बायपास रोड, कॅम्प, अमरावती -४४४ ६०२
*दूरध्वनी ०७२१-२६६२०६२ / २५५२९२३ फॅक्स ०७२१- २६६२७८२*
ईमेल–amravati.graduate2022@gmail.com वेबसाईट : http://amravatidivision.gov.in

**क्रमांकः उपआ(सा.प्र.)/जी.बी.४/प्र.क्र. ४७ /२०२२** **दिनांकः २७ऑक्टोबर, २०२२**

**निवडणूक/महत्वाचे**

**प्रति,**

जिल्हाधिकारी, तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी,
अमरावती विभाग पदविधर मतदारसंघ,
अमरावती / अकोला / बुलडाणा / यवतमाळ / वाशीम

**विषयः- अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघ विधानपरिषद निवडणूका-२०२३**
दि. ०१.११.२०२२ या अर्हता दिनांकावर मतदार नोंदणी करण्याबाबत...

संदर्भ:- मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक ईएलआर-२०२२/प्र.क्र.७४५/२२/३३ दिनांकः- २१ ऑक्टोबर, २०२२

भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक १४.०७.२०२२ च्या पत्रान्वये विषयांकित मतदार संघांच्या मतदार याद्या नव्याने तयार करण्याबाबत कार्यक्रम घोषित करण्यात आलेला आहे. त्यानुसार दिनांक ०१.१०.२०२२ ते ३०.१२.२०२२ या कालावधीत सदर कार्यक्रम पूर्ण करावयाचा आहे. भारत निवडणूक आयोगाच्या वर नमूद पत्रामध्येआयोगाच्या दिनांक ०५.०९.२०१६ च्या पत्रानुसार दिलेल्या सविस्तर सूचनांचे अनुपालन करुन पदवीधर मतदारसंघांच्या मतदार याद्या तयार करावयाच्या आहेत. भारत निवडणूक आयोगाच्या दिनांक ०५.०९.२०१६ च्या पत्रातील सूचनानुसार मतदारांकडून व्यक्तीशः सादर करण्यात येणा-या किंवा पोस्टाद्वारे पाठविण्यात येणा-या नमूना क्र. १८ व त्या सोबतच्या सहपत्राच्या आधारे मतदार नोंदणी अधिका-याकडून मतदार नोंदणीची प्रक्रिया करावयाची आहे. त्या व्यतीरीक्त सदर पत्रात परिच्छेद ९ येथे नमूद केल्याप्रमाणे सर्व पात्र व्यक्तींनी त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ठ करावे यासाठी सर्व प्रयत्न करावेत.

श्री. धनराज विसपुते यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र. ११५१९/२०२२ दाखल केली होती. या याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने, राज्यातील प्राधिका-यांनी/ राज्य निवडणूक आयोगाने दि.२५.१०.२०२२ पूर्वी पदवीधर मतदारसंघासाठीचा नमूना क्र.१८ ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य ती उपाययोजना करावी असे आदेश दि.१९.१०.२०२२ रोजी दिले आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी तातडीने करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाकडून मा. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई यांचे

कार्यालयाच्या तांत्रिक शाखेला आधार क्रमांक सुरक्षितरीत्या जतन करण्यासाठी आधार वॉल्ट तयार करण्याच्या अनुषंगाने सूचना प्राप्त झाल्या होत्या. राज्याच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या तसेच NIC च्या सहकार्याने सदर आधार वॉल्ट उपलब्ध करुन घेण्यात आलेला आहे. त्यानुसार मा. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने पदवीधर मतदारसंघासाठीचा नमूना क्र.१८ ऑनलाईन पध्दतीने भरण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली असुन सदर सुविधा मा. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर https://ceoelection.maharashtra.gov.in/graduate/ येथे उपलब्ध आहे. त्यानुसार आपणास खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

१. उपरोक्त लिंक आपल्या जिल्हयाचे संकेतस्थळावर सुध्दा ठेवण्यात यावी.
२. वरील पध्दतीने प्राप्त होणा-या अर्जांवर प्रक्रिया करुन मतदार नोंदणीबाबात उचित निर्णय घेण्यात यावा.
३. अर्जासोबत अपलोड करण्यात आलेला रहिवासासाठीचा पुरावा स्वयंसाक्षांकित असणे आवश्यक आहे.
४. अर्जासोबत जोडलेले शैक्षणिक अर्हतेबाबतचे कागदपत्र उदा. पदवी प्रमाणपत्र, गुणपत्रिका इत्यादी संबधित पदनिर्देशित अधिकारी / सहायक पदनिर्देशित अधिकारी / जिल्हयातील राजपत्रित अधिकारी/ नोटरी यांच्या कडून प्रमाणित करुन अपलोड करणे आवश्यक आहे.
५. अपलोड करण्यात आलेल्या प्रमाणपत्रांची / कागदपत्रांची पडताळणी त्याबाबतच्या मूळ प्रमाणपत्र/ कागदपत्रासोबत करुन घेणे आवश्यक असल्याने संबंधित मतदार नोंदणी अधिकारी यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्यामार्फत क्षेत्रिय भेटीद्वारे (field visit) अशी पडताळणी करुन घ्यावी.

उपरोक्त पध्दतीने नमूना क्र. १८ पदवीधर मतदारांच्या नोंदणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्याच्या बाबीला आपल्या स्तरावरुन आपल्या जिल्हयात व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी, ज्यायोगे सर्व पात्र व्यक्ती पदवीधर मतदारसंघासाठी आपले नाव नोंदवू शकतील.

**सहपत्र:- संदर्भिय पत्र**

**(डॉ.दिलीप पांढरपट्टे)**
**विभागीय आयुक्त**
**अमरावती**

**प्रतिलिपी**:-१.उपजिल्हा निवडणूक अधिकारी, ---------------------------(सर्व)

२. जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी,-------------------------------------उक्त पदवीधर मतदार नोंदणीसाठी मा. मुख्य निवडणूक अधिकारी, कार्यालयाने उपलब्ध करुन दिलेली लिंक, विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाचे संकेतस्थळावर ठेवण्यात यावी.